दाखल दिनांक : ३०.०५.२०१६

नोंदणी दिनांक : ३०.०५.२०१६

निकाल दिनांक : ०६.०५.२०२५

कालावधी : वर्षे महिने दिवस

०८ ११ ०६

CNR No. MHCH100010632015

**मुल, जि. चंद्रपूर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र. २)**

**यांच्या न्यायालयात.**

(पिठासीन अधिकारी : स. दि. कमलाकर)

**नियमित फौजदारी खटला क्र. ४६/२०१६** **निशाणी क्र. ३७**

**प्रथम खबरी अहवालाचे विवरण**

अपराध क्रमांक – ०३/२०१६ दिनांक – ०३.०१.२०१६

पोलीस ठाणे – मुल पोलीस ठाणे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी/अभियोग पक्ष** | – | महाराष्ट्र शासन, द्वारा पोलीस ठाणे अधिकारी,<br>मुल, पोलीस ठाणे, ता. मुल, जि. चंद्रपूर.<br>फिर्यादी – प्रविण सुकरुजी येरमे, |
| **अभियोग पक्षातर्फे** | – | कु. माधूरी जोगे, विशेष सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | – | व्यकंटी रामा घोडमारे, **(फरार)**<br>वय–२८ वर्षे, धंदा– मजूरी,<br>रा. बिरशी वॉर्ड, वडसा, ता. वडसा, जि. गडचिरोली. |
| **विधीज्ञ** | – | निरंक |

| | |
|---|---|
| अपराधाचा दिनांक – ०३.०१.२०१६ | प्रथम खबरी अहवाल दिनांक – ०३.०१.२०१६ |
| आरोपपत्र दाखल दिनांक – ३०.०५.२०१६ | आरोप निश्चिती दिनांक – निरंक |
| साक्षीपूरावा सुरु होण्याचा दिनांक – ०४.०३.२०२४ | निकाल राखून ठेवल्याचा दिनांक – १५.०४.२०२५ |
| निकाल दिनांक – ०६.०५.२०२५ | शिक्षेचा आदेश दिनांक – निरंक |

## आरोपीचे विवरण

आरोपीचे नाव – व्यकंटी रामा घोडमारे

अटक दिनांक – २५.०२.२०१६

जामीनावर सुटल्याचा दिनांक – १८.०४.२०१६ अपराध– भा.दं.वि. कलम ४५७, ३८० अन्वये.

निर्दोष मुक्तता अथवा दोषसिध्दी – निर्दोष मुक्तता. ठोठावण्यात आलेली शिक्षा– निरंक

संपरीक्षेदरम्यान भोगलेला कारावास – दि.२५.०२.२०१६ ते दि.१८.०४.२०१६

## अभियोग पक्षाने तपासलेल्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| १. | प्रविण सुखरुजी येरमे (नि.क्र.१३) | फिर्यादी |
| २. | कोपेश्वर गणपत मडावी (नि.क्र.१६) | पंच साक्षीदार |
| ३. | देविदास रुषी पिट्टलवार (नि.क्र.२०) | साक्षीदार |
| ४. | जामलाबाई सुखरु येरमे (नि.क्र.२४) | साक्षीदार |
| ५. | प्रतिभा प्रविण येरमे (नि.क्र.२५) | साक्षीदार |
| ६. | विष्णूदास सोनू मडावी (नि.क्र.३१) | साक्षीदार |
| ७. | देवाजी महादेव पाल (नि.क्र.३२) | साक्षीदार |
| ८. | रामचंद्र धर्माजी कुनघाडकर (नि.क्र.३४) | अन्वेषण अधिकारी |

## बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | नाव | साक्षीचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| क्रमांक | निशाणी क्र. | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | १४ | तोंडी रिपोर्ट |
| २. | १५ | प्रथम खबरी अहवाल |
| ३. | १७ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | २१ | ओळख परेड दरम्यानची दागिन्यांची यादी |
| ५. | २२ | ओळख परेड दरम्यानची दागिन्यांची यादी |
| ६. | २३ | पंच देविदास याला दिलेले सुचनापत्र |

### बचाव पक्षाने मान्य केलेली कागदपत्रे

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| क्रमांक | निशाणी क्रमांक | पूराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

### वस्तू

| क्रमांक | वस्तू क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## :: न्यायनिर्णय ::

(दिनांक ०६ मे, २०२५ रोजी घोषीत)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाच्या कलम ४५७, ३८० खालील

अपराधांकरीता खटला चालविण्यात आला असून अभियोग पक्षाचे कथन खालीलप्रमाणे आहे.

२] फिर्यादी प्रविण याने दि.०३.०१.२०१६ रोजी मुल पोलीस ठाणे येथे रिपोर्ट दिला की, तो व त्याची पत्नी सिंदेवाही येथे नोकरीनिमित्त राहतात. त्याचे मुळगाव बेलघाटा असून तिथे त्याची आई एकटीच राहते. दि.०२.०१.२०१६ रोजी बेलघाटा येथे नाटक पाहण्यासाठी तो व त्याची पत्नी सायंकाळी ४.०० वाजता तिथे पोहोचले. फिर्यादी हा नाटकाचा उपाध्यक्ष असल्याने तो सायंकाळी ७.०० वाजेपासून तिकीट विक्रीसाठी बसला. रात्री ११.०० वाजता तिकीट विक्री संपल्यानंतर तो उप–सरपंच देविदास पिट्टलवार यांच्या घरी रात्री ११.०० वाजेनंतर जेवण करुन पुन्हा नाटक पाहायला गेला.

३] त्याची आई व पत्नी रात्री १०.३० वाजता घराला कुलूप लावून नाटक पहायला आल्या होत्या. दि.०३.०१.२०१६ रोजी ५.१० वाजेच्या सुमारास त्याच्या घराचे कुलूप व साखळी तोडून चोरी झाल्याबाबत त्याच्या पत्नीने व शेजारील लोकांनी त्याला थिएटरमध्ये येवून माहिती दिली. तो घरी आला असता त्याला त्याच्या घराच्या दोन्ही खोल्यांची कुलूप तोडून मधल्या खोलीमध्ये ठेवलेली सुटकेस तुटलेली दिसली. त्यातील १) सोन्याचा मुखरा अंदाजे ९ ग्रॅम किंमत रु.१२,६००/–, २) सोन्याची अंगठी ५ ग्रॅम किंमत रु.१२,०००/–, ३) कानातील सोन्याच्या बीऱ्या ३ ग्रॅम किंमत रु.७,२००/–, ४) चांदीचा कळदोडा अंदाजे १२ तोळे किंमत रु.४,२००/–, ५) चांदीची चाळ अंदाजे वजन ३ तोळे किंमत रु.१,०५०/– आणि ६) नगदी रोख रक्कम रु.८,०००/– असा

एकूण रु.५४,०५०/– ची कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून चोरी केली. म्हणून त्याने सदर रिपोर्ट दिला.

४] या रिपोर्टवरुन उपरोक्त कलमांखालील अपराधाकरीता गुन्हा क्रमांक ०३/२०१६ नोंदविण्यात आला. त्याचा तपास पोलीस उप–निरीक्षक श्री. एम. एम. गोखरे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला, पोलीस स्टेशन रामनगर यांच्याकडून या गुन्ह्यात चोरीला गेलेला मुद्देमाल हस्तगत करुन तपासकामी दाखल केला. आरोपीला अटक करुन न्यायालयासमक्ष हजर केले. पंचांसमक्ष त्याचा निवेदन पंचनामा केला, साक्षीदारांचे जवाब नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा आढळल्याने न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

५] आरोपी याची जामीनावर मुक्तता झाल्यापासून फरार आहे. त्याला वारंवार वॉरंट काढल्यानंतर त्याच्याविरुध्द फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ८२ नुसार जाहीरनामा काढण्यात आला. तरी देखील त्याची हजेरी नोंदविता आली नाही. त्यानंतर फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २९९ अन्वये त्याच्या गैरहजेरीत साक्षीपूरावा नोंदविण्यात आला.

६] वि. विशेष सहा. सरकारी अभियोक्त्यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघाले असून मी त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. ०२.०१.२०१६ ते दि. ०३.०१.२०१६ रोजी रात्रीच्या दरम्यान मौजा बेलघाटा येथे आरोपीने फिर्यादीच्या घरामध्ये चोरीच्या उद्देशाने बेकायदेशिररित्या प्रवेश केला व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधानाच्या कलम ४५७ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी. |
| २. | त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीच्या घरातील सुटकेसमधील एकूण रु.५४,०५०/– किंमतीच्या सोन्या चांदीच्या दागिन्यांची व रोख रकमेची चोरी केली व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधानाच्या कलम ३८० अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नकारार्थी. |
| ३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

:: **कारणमिमांसा** ::

**मुद्दे क्रमांक १ व २ करीता :**

७] वरील मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रितपणे केली आहे. फिर्यादी प्रवीण याच्या साक्षीत असे आले आहे की, तो आरोपीला ओळखत नाही. घटना दिनांक ०३.०१.२०१६ रोजी पहाटे ५.०० वाजेच्या सुमारास बेलघाटा येथे त्याच्या घरी घडली. दिनांक ०२.०१.२०१६ रोजी तिथे रात्री ११.०० वाजेच्या सुमारास नाटक सुरु होते. ते पाहण्यासाठी तो, त्याची आई आणि पत्नी असे गेले होते. नाटक पाहून त्याची पत्नी आणि आई घरी परत आले व तो तिथेच थांबला होता. त्याची आई आणि पत्नी यांना घराचे कुलूप तोडलेले दिसले. घरातील सामान अस्ताव्यस्त टाकलेले होते. दोन्ही

खोल्यांची कुलूपे तुटलेली होती. त्यानंतर त्याला बोलाविण्यासाठी एक व्यक्ती आला व त्याने त्याला घटनेबाबत माहिती दिल्याने तो घरी गेला. तिथे पाहणी केली असता सुटकेसमध्ये ठेवलेले ९ ग्रॅम सोन्याचा मुखरा, ५ ग्रॅम सोन्याची अंगठी, ३ ग्रॅमच्या सोन्याच्या कानातल्या बीऱ्या, १२ तोळ्यांचा चांदीचा करदोडा, ३ तोळ्यांचा चांदीचा चाळ व रोख ८ हजार इत्यादी वस्तू चोरीला गेल्याचे त्याच्या निदर्शनास आले. म्हणून त्याने पोलीस ठाण्यात नि.क्र.१४ वरील तोंडी रिपोर्ट दिला. दि.२०.०५.२०१६ रोजी पोलीसांनी त्याला पोलीस ठाण्यात बोलावून दागिने ओळखण्यास सांगितले होते. पोलीस ठाण्यात तो आणि त्याची आई गेले होते. तिथे त्यांनी त्यांचे चोरीला गेलेले दागिने ओळखले. ते दागिने घोडमारे नावाच्या इसमाने चोरी केल्याचे नंतर त्याला पोलीसांकडून समजले.

८] साक्षीदार क्र.४ जामलाबाई हिच्या साक्षीत असे आले आहे की, त्यादिवशी ती, तिचा मुलगा आणि सुन असे घराला कुलूप लावून नाटक पाहायला गेले. ते पहाटे ४.०० वाजता घरी परत आले असता त्यांना घराचा दरवाजा उघडा दिसला. ते आतमध्ये गेले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. तिच्या दागिन्यांचा डबा सुटकेसमध्ये ठेवला होता. जाताना तिने त्याला कुलूप लावले होते. त्या डब्यामध्ये तिचा अर्धा तोडे सोन्याचा मुखरा, चांदीचे पैंजण, चांदीचा कंबर तोडा, सोन्याची अंगठी, कानातील सोन्याच्या बीऱ्या आणि रोख रक्कम अंदाजे तीन ते चार हजाराची चोरी झाली होती. ते दागिने व रोख रक्कम कोणी चोरुन नेली हे त्यांना माहीती नव्हते. घटनेबाबत तिच्या मुलाने पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला.

९] तिने अभियोग पक्षास समर्थन न केल्याने वि. सहा. सरकारी अभियोक्त्यांनी त्याला उलट तपासणीच्या स्वरुपातील प्रश्न विचारले असता त्यात तिने चोरी झाल्यानंतर सुमारे वीस दिवसांनी पोलीसांनी तिला पोलीस स्टेशनला बोलाविले होते, त्यावेळी तिची सुन व मुलगा हे सूध्दा पोलीस स्टेशनला आले होते, पोलीसांनी तिला तिथे सोन्याचा मुखरा, सोन्याची अंगठी आणि सोन्याच्या बीऱ्या दाखविल्या होत्या या बाबी मान्य केल्या. तिला तिच्या जवाबामधील रेखांकीत भाग 'अ' वाचून दाखविला असता तो तिने पोलीसांना सांगितला नव्हता. परंतू तो त्यात का आहे याचे कारण ती सांगू शकली नाही. पोलीसांनी दाखविलेले सोन्याचे दागिने तिचे नव्हते, पोलीस स्टेशनला तिने तिचे अस्सल दागिने पाहीलेच नव्हते तसेच चोरी कोणी केली हे तिला माहित नसल्याचे तिने म्हटले आहे.

१०] साक्षीदार क्र.५ प्रतिभा हिच्या साक्षीत असे आले आहे की, घटना दि.०२.०१.२०१६ रोजी त्यांच्या घरी घडली. त्यादिवशी त्यांच्या गावात नाटक आल्याने ते पाहण्यासाठी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास ती, तिचे पती आणि सासू जामलाबाई असे गेले होते. घराला कुलूप लावून गेल्याने त्यांच्या घरी कोणी नव्हते. नाटक पाहून ते पहाटे ५.०० वाजता घरी परत आले असता घराच्या दरवाज्याला लावलेले कुलूप तोडलेले दिसले. ते आतमध्ये गेले असता घरातील सामान अस्ताव्यस्त पडलेले होते. नाटकाला जाताना त्यांनी सुटकेसला कुलूप लावलेले होते. त्यामध्ये चांदीचा कंबर पट्टा, चांदीचे चाळ, सोन्याचा मुखरा, सोन्याची अंगठी आणि सोन्याचे कानातले होते. घरामध्ये तांदळाच्या कट्यामध्ये दहा हजार रुपये रोख ठेवलेले होते. तिच्या पर्स मध्ये चार हजार रुपये रोख

ठेवलेले होते. या सर्व दागिन्यांची व रोख रक्कमेची चोरी झाल्याने तिच्या पतीने पोलीस ठाण्यात रिपोर्ट दिला. त्यानंतर सुमारे एक वर्षाने पोलीसांनी त्यांना सोन्याचा मुखरा, सोन्याची अंगठी आणि सोन्याचे कानातले दागिने दाखविले, ते त्यांचेच असल्याने त्यांनी ओळखले. ते दागिने वडसा येथील एका व्यक्तीकडून मिळाल्याचे पोलीसांनी त्यांना सांगितले होते. ते दागिने त्यांनी सोडविले नव्हते. चोरी कोणी केली होती हे तिला माहिती नसल्याचे तिने म्हटले आहे.

११] साक्षीदार क्र.६ विष्णूदास याच्या साक्षीत असे आले आहे की, तो फिर्यादीला ओळखतो कारण तो त्याच्या गावात राहतो. अंदाजे ८ वर्षांपूर्वी एका दिवशी त्याच्या गावात नाटक आल्याने ते पाहण्यासाठी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास तो व त्याच्या घरचे गेले होते. ते नाटक पहाटे ५.०० वाजता संपले. तिथून आल्यानंतर त्याला प्रविण याच्या घराचे कुलूप तुटलेले दिसले. आजुबाजूचे लोक तिथे जमा झाले. त्यांनी प्रविण याला त्याबाबत कळविल्याने तो घरी आला व त्याने पाहणी केली असता त्याला त्याच्या घरातील सोन्या चांदीचे दागिने व नगदी रु.८,०००/– चोरीला गेल्याचे समजले. ते दागिने व रक्कम कोणी चोरुन नेले हे त्याला माहिती नसल्याचे त्याने म्हटले आहे.

१२] साक्षीदार क्र.७ देवाजी याने अभियोग पक्षास समर्थन केले नाही. वि. सहा. सरकारी अभियोक्त्यांनी त्याला विचारलेल्या उलट तपासणीच्या स्वरुपातील प्रश्नांमधून अभियोग पक्षास लाभदायक असे काहीही समोर आले नाही. उपरोक्त साक्षीपूरावा पाहता घटनेस कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. फिर्यादी प्रविण, कोपेश्वर, जामलाबाई, प्रतिभा,

विष्णूदास यांच्या साक्षीतून त्यादिवशी फिर्यादीच्या घरी चोरी झाल्याचे समोर आले आहे. परंतू ती चोरी आरोपीने केली हे कुठल्याही साक्षीदाराच्या साक्षीतून स्पष्ट होत नाही. प्रविण याच्या साक्षीनुसार ते दागिने सापडले. ते घोडमारे नावाच्या इसमाने चोरी केल्याचे नंतर त्याला पोलीसांकडून समजले. ती चोरी कोणी केली याबाबत जामलाबाई हिला काहीही सांगता आले नाही. प्रतिभा हिने म्हटले आहे की, त्यांचे चोरीला गेले दागिने वडसा येथील एका व्यक्तीकडून मिळाल्याचे त्यांना पोलीसांनी सांगितले. तिने त्या इसमास पाहीले नव्हते. प्रथम खबरी अहवाल पाहता तो अज्ञात व्यक्तीविरुध्द देण्यात आलेला आहे.

१३] अभियोग पक्षाने सा.क्र.८ श्री. कुनघाडकर यांची साक्ष नोंदविलेली आहे. त्यांनी म्हटले आहे की, गुन्ह्याचा प्राथमिक तपास त्यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी नि.क्र.१७ वरील घटनास्थळ पंचनामा केला. त्यानंतर गुन्ह्याचा पुढील तपास श्रीमती गोखरे यांनी केला. या बाबी पाहता श्री. कुनघाडकर यांची साक्ष अभियोग पक्षास फारशी उपयुक्त ठरत नाही. श्रीमती गोखरे यांना साक्षकामी वारंवार समन्स काढूनही त्या गैरहजर राहील्या आहेत. त्यामुळे गुन्ह्यामध्ये आरोपीचा सहभाग कशाप्रकारे आहे ही महत्वाची बाब सिध्द करणारा पूरावा समोर आलेला नाही. आरोपीस राम नगर पोलीस स्टेशन, चंद्रपूर येथे नोंदविलेल्या अपराध क्र.११२/२०१५ या गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. त्या तपासादरम्यान त्याचा भारतीय पुरावा कायद्याचे कलम २७ अन्वये निवेदन पंचनामा नोंदविण्यात आला होता. परंतू तो पंचनामा सिध्द करण्याकामी त्यावरील पंचांची देखील साक्ष नोंदविण्यात आलेली नाही.

१४] घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने साक्षीदार क्र.२ कोपेश्वर याची साक्ष नोंदविली आहे. त्याच्या साक्षीतून अभियोग पक्षाने नि.क्र.१७ वरील घटनास्थळ पंचनामा सिध्द केला आहे. त्यानंतर जप्त दागिन्यांचा ओळख पंचनामा सिध्द करण्याकामी अभियोग पक्षाने सा.क्र.३ देविदास याची साक्ष नोंदविली आहे. त्याने सुरवातीस अभियोग पक्षास समर्थन केले नाही. परंतू वि. सहा. अभियोक्त्यांनी त्याला विचारलेल्या उलट तपासणीच्या स्वरुपातील प्रश्नांमधून अभियोग पक्षाने नि.क्र.२१ व २२ वरील दस्त सिध्द केले आहेत. ते दस्त जप्त दागिन्यांच्या ओळख परेड बाबतचे आहेत. परंतू असे असले तरीही समोर आलेला एकंदरीत साक्षीपूरावा पाहता गुन्ह्याशी आरोपीचा थेट संबंध जोडणारा सुस्पष्ट असा पूरावा समोर आलेला नाही. प्रविण, कोपेश्वर, जामलाबाई, प्रतिभा, विष्णूदास हे साक्षीदार घटना घडल्यानंतर घटनास्थळी पोहोचले होते. त्यामुळे त्यांची साक्ष जरीही अभियोग पक्षाच्या कथनांना पुष्टी देणारी असली तरीही ती चोरी आरोपीने केली हे सर्वप्रथम स्पष्ट होणे गरजेचे होते. म्हणून एकंदरीत उपरोक्त साक्षीपूरावा पाहता ती बाब सिध्द होत नाही.

१५] आरोपी हा त्याची वैयक्तीक जामीनावर दि.१८.०४.२०१६ रोजी मुक्तता झाल्यापासून फरार आहे. प्रस्तुतचा खटला हा ०८ वर्षांपेक्षा जास्त जूना आहे. अशा परिस्थितीमध्ये उपरोक्त साक्षीपूरावा विचारात घेता प्रस्तुतचा खटला अनिश्चीत काळासाठी प्रलंबित ठेवून काहीही साध्य होणार नाही. म्हणून या सर्व बाबी पाहता आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करणे न्यायोचित ठरेल. या कारणास्तव मी मुद्दे क्र.१ व २ चे उत्तर नकारार्थी देत मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) आरोपीची फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ४५७, ३८० खालील दोषारोपातून सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीची जामीन बंधपत्रे जप्त करण्यात येतात.

३) **जप्त मुद्देमाल** – १) ९.२०० ग्रॅम वजनाचा सोन्याचा मुखरा, २) ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, ३) ३ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या बीऱ्या (२ जोड) हा मुद्देमाल अपील कालावधीनंतर फिर्यादी प्रविण सुखरुजी येरमे यास नियमानुसार परत करण्यात यावा.

४) आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ४३७–अ अन्वये रुपये १५,०००/– ची जामीन बंधपत्रे द्यावीत. ती आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीकरीता वैध राहील.

(न्यायनिर्णय खूल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

SAMEER DILIP KAMALAKAR
Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2025.05.06 17:47:18 +0530

स. दि. कमलाकर

दिनांक : ०६.०५.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र. २), मूल,
जि. चंद्रपूर.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | जी. डी. किटे |
| न्यायालयाचे नाव | : | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, (न्यायालय क्र.२) मुल. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०६.०५.२०२५ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०६.०५.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०६.०५.२०२५ |

...........